लोकमत

# आय विटनेस झेंडू बहरला.....



शिवाजी विद्यापीठाचा परिसर मुळातच देखणा आहे. त्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या सभोवती असलेले झेंडू चांगले फुलले आहेत. त्यामुळे हा परिसर अधिकच सुंदर दिसत आहे. (छाया : आदित्य वेल्हाळ)

15 APR 2023 क्रांतीसिंह
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रा. कृ. कणबरकर पुरस्कारातून दातृत्वाची परंपरा



कोल्हापूर(प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठाच्या प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने दातृत्वाची परंपरा निर्माण केली आहे, असे प्रतिपादन सिक्कीमचे माजी राज्यपाल व खासदार श्रीनिवास पाटील यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार-२०२३ त्यांच्या हस्ते भारती अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना देण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, मानपत्र, ग्रंथभेट, पुष्पगुच्छ व एक लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला.

पाटील म्हणाले, विद्यापीठाच्या स्थापनेपासूनचा मी साक्षीदार आहे. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांची परंपरा पुढे वाहून नेणारे अनेक पाईक या भूमीमध्ये निर्माण झाले. त्यांच्या समृद्ध विचारांची परंपरा शिवाजी विद्यापीठ पुढे चालवत हीरक महोत्सव साजरा करत आहे, याचा अभिमान वाटतो. कणबरकर पुरस्कारप्राप्तची बहुतांश मान्यवरांनी आपल्याला मिळालेली पुरस्काराची रक्कम ही पुन्हा जनहितार्थ पुढे दानच केल्याचा इतिहास आहे.

ते म्हणाले, कष्टकरी आई-बापाच्या पोटी जन्मलेल्या पतंगराव व शिवाजीराव कदम बंधूंनी अथक परिश्रम करत शिक्षण घेतले आणि प्रगती साधली; मात्र त्यांनी ही प्रगती स्वतःपुरती न राखता समाजातील अन्य गोरगरीब घटकांतील विद्यार्थ्यांपर्यंत घेऊन जाण्याचा चंग बांधला. त्यातून भारती विद्यापीठाचा वटवृक्ष निर्माण झाला आणि तो देशभरात फोफावला. आज पतंगराव असते तर त्यांनी हा सोहळा डोळे भरून पाहिला असता.

डॉ. कदम म्हणाले, बंधू पतंगराव व मी शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहोत. त्यामुळे विद्यापीठाने विद्यार्थ्यांचा केलेला हा गौरव आहे, अशी माझी भावना आहे.


यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही. एम. चव्हाण, डॉ. बी. पी. साबळे, डॉ. बी. एम. हिर्डेकर, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्रा. डी. यु. पवार, प्राचार्य रा. तु. भगत, प्राचार्य प्रकाश कुंभार, डॉ. नमिता खोत, डॉ. अंजली साबळे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. बाबासाहेब खोत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भालबा विभूते यांनी मानपत्राचे वाचन केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

### बागल विद्यापीठास ५ लाख एक रुपयांची देणगी

*डॉ. कदम यांनी पुरस्काराच्या १ लाख ५१ हजार रुपयांच्या रकमेत भर घालून कोल्हापूरच्या भाई माधवराव बागल विद्यापीठास ५ लाख एक रुपयांची देणगी जाहीर केली. बागल विद्यापीठाचे कार्यकारिणी सदस्य ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी देणगीचा स्वीकार केला. आपल्या उमद्या स्वभावाला धरूनच आपले हे कृत्य आहे, या शब्दांत डॉ. पवार यांनी डॉ. कदम यांचे कौतुक केले.*

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 APR 2023 तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी त्यांना प्रतिमेस अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, रणधीर शिंदे, डॉ. रमेश कांबळे आदी.

# शिवाजी विद्यापीठात डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती शुक्रवारी मोठ्या उत्साहात साजरी झाली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनमध्ये डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र- कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. रमेश कांबळे, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. आंबेडकर संशोधन केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. तानाजी साळुंखे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश कांबळे, तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. अविनाश भाले,डॉ. दीपा श्रावस्ती, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

16 APR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एनएसएस विद्यापीठाला समाजाशी जोडते

प्रतिनिधी
कोल्हापूर

राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वयकांच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहचणे शक्य आहे. हा विभाग समाजाशी जोडलेला आहे. त्यामुळे विविध योजना, धोरणे यांचा प्रचार आणि प्रसार उत्तमरित्या करणे शक्य आहे. त्या दृष्टीने समन्वयकांनी कार्यरत राहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित 'सार्वजनिक वित्तिय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) प्रशिक्षण व मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे यांच्यासह सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाच्या कक्ष अधिकारी शीतल उगले यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : विद्यापीठातील एनएसएसच्या कार्यशाळेत बोलताना अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख. सोबत रमेश लिथडे, सिद्धार्थ शिंदे, विवेककुमार सिन्हा, डॉ. तानाजी चौगुले, शीतल उगले, डॉ. प्रकाश गायकवाड.

## ■ अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांचे प्रतिपादन

डॉ. देशमुख म्हणाले, शिवाजी विद्यापीठ संलग्नित २८६ महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहे. त्याचबरोबर, समानता आणि गुणवत्ता यावरही भर दिला जात आहे.

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य सिध्दार्थ शिंदे म्हणाले, विद्यापीठास समाजाशी जोडण्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मोठे योगदान आहे. विद्यार्थी हा प्रगतीशील समाजाचा घटक बनण्यासाठी विविध योजना राबवित असतो. समाजघटकांनी योग्य प्रतिसाद देऊन त्या योजना यशस्वीरित्या राबवून शासनाला सहकार्य करावे.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोल्हापूर विभागीय कार्यालयाचे विभागीय व्यवस्थापक विवेककुमार सिन्हा म्हणाले, पीएफएमएस ही एक सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन सेवा आणि संगणकीय प्रणाली आहे. तिच्या सहाय्याने शासनाच्या विविध योजनांचे अनुदान, सवलती आणि त्या संबधित प्राप्त होत असलेले इतर आर्थिक लाभ कोणाच्याही हस्तक्षेपाविना इंटरनेटच्या माध्यमातून थेट युजरच्या बँक खात्यामध्ये जमा होते. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी प्रास्ताविक केले. कराड येथील संत गाडगेबाबा महाराज महाविद्यालयाचे अभय पाटील यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव रमेश लिधडे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे दिनेश जाधव आदी उपस्थित होते.